# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१, फोन २२७०४४००,२२७०३०८६
E-mail@mchmumbai.org Web site:www.mchmumbai.org

## जाहिर सूचना

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना व जनतेला सूचित करण्यात येते की, महाराष्ट्रातील विविध संघटना आणि डॉक्टर्स यांचेकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की, होमिओपॅथिक डॉक्टरांना सार्वजनिक सूचनेद्वारे, इलेक्ट्रॉनिक प्रिंट आणि सोशल मिडिया, वेबसाईटद्वारे, सरकारी दस्तऐवज जसे एफ.आय.आर, नोटीस, प्रेसनोट द्वारे बोगस व भोंदू डॉक्टर्स संबोधण्यात आले आहे, असे तक्रारीत म्हटले आहे.

वरील संदर्भात असे कळविण्यात येते की, केंद्रिय होमिओपॅथी परिषद कायदा १९७३ च्या दुसऱ्या परिशिष्ठांतर्गत महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिलमध्ये रितसर नोंदणी केलेली व्यक्ती व सध्या प्रचलित असलेलया राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग कायदा २०२० अंतर्गत, महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६० चा सुधारित कायदा दि. १ जुलै २०१४ अन्वये कायदेशीररित्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नोंदणीकृत आहेत. त्यामुळे त्यांना खोडसाळपणे भोंदू किंवा बोगस डॉक्टर म्हणण्याचा प्रश्नच येत नाही.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. सीआयएम-२०००-१३४८/प्र.क.१८३/२००० अधिनियम दि. १९ ऑगस्ट २००० प्रमाणे जे होमिओपॅथिक व्यावसायिक महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम १९६१ मधील कलम ३३(1) (i) अनुसार आणि महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यावसायिक अधिनियम १९६० कलम २०, महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल १९६५ आणि इंडियन मेडिकल कौन्सिल १९५६ अन्वये विहित प्रक्रियेद्वारे तयार केलेल्या नोंदवहीत नोंदणीकृत असल्यास ते वैद्यकीय व्यावसायिक बोगस वैद्यकीय व्यावसायिक ठरत नाहीत. **ही नोंद घ्यावी, त्यामुळे अशा नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना बोगस म्हणणे बेकायदेशीर तसेच त्यांचेवर अन्यायकारक व बदनामीकारक ठरते.**

महाराष्ट्रातील होमिओपॅथिक परिषदेतील नोंदणीकृत व्यावसायिकांचा भोंदू किंवा बोगस डॉक्टर्स असा उल्लेख करणे हा कायद्याने गंभीर गुन्हा आहे. अशी बदनामी करणाऱ्यांविरुध्द प्रचलित कायद्यानुसार दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कारवाई होऊ शकते, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**टिप- परिषदेच्या www.mchmumbai.org या संकेतस्थळावरील डाऊनलोड मध्ये नोंदणीकृत होमिओपॅथिक डॉक्टराची यादी उपलब्ध आहे.**

ठिकाण – मुंबई
दि.- ९ मार्च २०२२

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY • MUMBAI •

डॉ. सोमनाथ त्रिं. गोसावी
प्रशासक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

डॉ. कैलास रा. सोनमनकर
प्रबंधक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी